# महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा - युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

यांच्या संयुक्त विद्यमाने

करिअर कट्टा

युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी.....

Digital presence
(connect with us)

YouTube

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF Video

## 01 करिअर कट्टा संकल्पना

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ‘करिअर कट्टा’ हा उपक्रम राबविला जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास, उद्योजकता व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा यामागील प्रमुख उद्देश आहे.

राज्यभर उभारण्यात येत असलेल्या सेंटर ऑफ एक्सलन्स, स्टेट रिसोर्स सेंटर, पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, तसेच विविध कौशल्य व उद्योगाभिमुख उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षण दिले जाते. करिअर संसद, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि समन्वय यंत्रणेद्वारे विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना चालना देत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम प्रभावीपणे कार्यरत आहे.

**मा. यशवंत शितोळे**
अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF Video

## 02 करिअर कट्टा - संस्थात्मक संरचना

करिअर कट्टा
युवकांच्या
सर्वांगीण विकासासाठी...

करिअर कट्टाची संस्थात्मक रचना सुदृढ व प्रभावी आहे. सल्लागार मंडळात विविध अधिकारी, उद्योजक व मान्यवरांचा समावेश आहे. तसेच विभागीय प्राचार्य प्रवर्तक, विभागीय व सहविभागीय समन्वयक, जिल्हा समन्वयक आणि सेवानिवृत्त मान्यवरांचाही विशेष सहभाग आहे. याशिवाय राज्यस्तरीय CSR, करिअर संसद, आर्थिक साक्षरता, कौशल्य विकास, पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, प्रकाशन, स्पर्धा नियोजन, समन्वय, MPSC/UPSC मार्गदर्शन, उद्योजकता, बँकिंग व कॉर्पोरेट प्लेसमेंट अशा विविध समित्या सक्रियपणे कार्यरत आहेत.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF Video

## 03 करिअर कट्टा उपक्रम आणि विविध कोर्सेस

- ३६५ दिवस चालणारे कोर्स म्हणजे आयएएस आपल्या भेटीला, उद्योजक आपल्या भेटीला आणि वृत्तवेध चालू घडामोडी
- ५२ आठवडे संवाद शृंखला
- 50 Add on course

IAS आयएएस आपल्या भेटीला | ENTREPRENEUR उद्योजक आपल्या भेटीला | वृत्तवेध चालू घडामोडी | संवाद शृंखला

करिअर कट्टा उपक्रमांतर्गत ३६५ दिवस चालणारे विविध नियमित उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविले जातात. UPSC / MPSC मार्गदर्शन, IAS व उद्योजक आपल्या भेटीला, वृत्तवेध चालू घडामोडी, उद्योजकता प्रशिक्षण व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यांसह ५२ आठवड्यांची संवाद श्रृंखला आणि Add-on कोर्सेसद्वारे आत्मविश्वास, कौशल्य विकास व करिअर घडविण्यास चालना मिळते.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF Video

## 04 प्रशासकीय मान्यता पत्रे

राज्य शासनाने निर्देशित केल्यानुसार संचालक कार्यालय आणि विद्यापीठ यांनी परिपत्रके काढून या उपक्रमास मान्यता दिलेली आहे. तसेच महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये या उपक्रमाचा समावेश करण्यासही मान्यता दिलेली आहे. यामुळे या उपक्रमांतर्गत आकारण्यात येणारी फी विविध शासकीय प्रतिपूर्ती शिष्यवृत्ती योजनांद्वारे विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यास सुलभता निर्माण होऊ शकते.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF Video

## 05 प्राचार्य प्रवर्तक व जिल्हा समन्वयक कार्यपद्धती

Coordinator

करिअर कट्टा उपक्रमामध्ये प्राचार्य प्रवर्तक व जिल्हा समन्वयक मुख्य नियोजन, प्रशिक्षण व कामकाजाची जबाबदारी सांभाळतात. तर प्राचार्य हा उपक्रम विद्यार्थीभिमुख व्हावा यासाठी प्रयत्न करतात. महाविद्यालयीन समन्वयक विद्यार्थ्यांची नोंदणी, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व कौशल्य विकास माहिती देण्याचे कार्य करतात. ही समन्वय यंत्रणा उपक्रमाची प्रभावी व सुनियोजित अंमलबजावणी सुनिश्चित करते.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF Video

## 06 करिअर कट्टा सामंजस्य करार

MoU

महाविद्यालय आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र (MITSC) यांच्यात करण्यात आलेल्या सामंजस्य करारांतर्गत (MoU) ‘करिअर कट्टा’ उपक्रम राबविण्यासाठी एक सुदृढ व समन्वयात्मक यंत्रणा निर्माण केली जाते. या कराराचा उद्देश विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास, उद्योजकता, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, तंत्रज्ञान आधारित प्रशिक्षण व रोजगाराभिमुख उपक्रम प्रभावीपणे राबविणे हा आहे. तसेच दोन्ही संस्थांच्या सहकार्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उपक्रमांची अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांना व्यापक संधी उपलब्ध करून दिल्या जातात याचा नॅकमध्ये उपयोग होतो.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF Video

## 07 सेंटर ऑफ एक्सलन्स

सेंटर ऑफ एक्सलन्स

करिअर कट्टा अंतर्गत Center of Excellence स्थापनेद्वारे महाविद्यालयांमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व उद्योजकता विकासाला चालना दिली जाते. येथे डिजिटल क्लासरूम, कॉमन फॅकल्टी, ऑनलाइन मार्गदर्शन, मेंटरिंग व Mock Tests उपलब्ध असतात. Startup व Incubation सुविधा दिल्या जातात तसेच विद्यार्थी संख्येनुसार महाविद्यालयांना आर्थिक सहाय्य व पायाभूत सुविधा पुरवण्यात येतात.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF Video

## 08 College of Excellence with Potential

CoE-P
College of Excellence with Potential

ही योजना १००० पेक्षा कमी विद्यार्थीसंख्या असलेल्या महाविद्यालयांसाठी राबवली जाते. या योजनेत वैयक्तिक किंवा क्लस्टर पद्धतीने सहभाग घेता येतो. करिअर, उद्योजकता, स्पर्धा परीक्षा व कौशल्य विकासावर भर दिला जातो. विद्यार्थी संख्येनुसार रु. ९,००० ते रु. ६०,००० पर्यंत प्रोत्साहनपर रक्कम दिली जाते. स्किल ट्रेनिंग व पायाभूत सुविधा हे प्रमुख घटक आहेत. यामधील सहभागासाठी सामंजस्य करार व करिअर संसद स्थापना अनिवार्य आहे.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF Video

## 09 कार्यशाळा

आवाजाची कार्यशाळा
आवाज गुरूजनांचा...
वेध देशाच्या भवितव्याचा...

FDP
FACULTY DEVELOPMENT PROGRAM

AI for Teachers

करिअर कट्टा अंतर्गत निवासी व ऑनलाईन/ऑफलाईन कार्यशाळांद्वारे विद्यार्थी व प्राध्यापकांच्या क्षमता विकासावर भर दिला जातो. AI टीचर ट्रेनिंग, डिझाईन थिंकिंग, EQ (भावनिक बुद्धिमत्ता) अशा प्रकारचे FDP घेतले जातात. आर्थिक साक्षरता, आवाजाची कार्यशाळा अशा प्रकारच्या विविध कार्यशाळांद्वारे तांत्रिक कौशल्य, सर्जनशीलता, भावनिक विकास व आर्थिक नियोजनाचे सक्षम प्रशिक्षण प्राध्यापकांना दिले जाते.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF Video


Web. : www.mitsc.co.in

Contact : 7507652555

Email : careerkatta365@gmail.com

# महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

यांच्या संयुक्त विद्यमाने

# करिअर कट्टा - युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी

## CSR Project

करिअर कट्टा CSR अंतर्गत

मधुर समन्वय | Food On Wheel

करिअर कट्टा उपक्रमांतर्गत CSR माध्यमातून मधुर क्रांती, कृषी उद्योजकता विकास व फूड व्हॅन हे प्रमुख उपक्रम राबवले जातात. मधुमक्षिका पालन, कृषी ड्रोन, मिलेट्स प्रोसेसिंग यांसह फूड व्हॅनद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवसाय अनुभव, उद्योजकतेची प्रेरणा व कौशल्य विकासाची संधी उपलब्ध करून दिल्या जातात.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF 10 Video

## करिअर संसद

करिअर संसद हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवला जाणारा एक प्रभावी व अभिनव उपक्रम आहे. यामध्ये मंत्रिमंडळाच्या धर्तीवर विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना विविध जबाबदाऱ्या दिल्या जातात, ज्यामुळे नेतृत्व, संवादकौशल्य आणि व्यवस्थापन कौशल्यांचा विकास होतो. करिअर डायरीच्या माध्यमातून विद्यार्थी करिअरचे नियोजन, उद्दिष्ट निश्चिती व आत्मपरिक्षण करतात. तसेच दिल्ली अभ्यास दौऱ्यासाठी करिअर संसदेमधील विद्यार्थी निवडले जातात. या दौऱ्याद्वारे शासकीय यंत्रणेचे प्रत्यक्ष निरीक्षण व करिअर मार्गदर्शन मिळते, ज्यामुळे आत्मविश्वास व स्पष्ट दिशा निर्माण होते.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF 11 Video

## विविध क्लब

EQ CLUB | Finance Club | Business Club — An Initiative Under Career Katta

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तीन विशेष क्लब कार्यरत आहेत.

– EQ क्लबद्वारे भावनिक बुद्धिमत्ता व संवाद कौशल्य यांची जाणीव निर्माण केली जाते. या अंतर्गत USA च्या '6 Seconds' संस्थेशी भागीदारीत जागतिक दर्जाचे EQ मूल्यांकन होते.

– बिझनेस क्लबद्वारे उद्योजकता प्रशिक्षण व व्यावसायिक अनुभव मिळतो.

– फायनान्स क्लबद्वारे आर्थिक नियोजन व बचतीचे ज्ञान दिले जाते.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF 12 Video

## उपक्रम दिनदर्शिका

वार्षिक उपक्रम दिनदर्शिका

| तारीख | कार्यक्रम |
|---|---|
| 1 जानेवारी | कृतज्ञता दिन |
| ३ ते ७ जानेवारी | करिअर संसद अधिवेशन |
| 12 जानेवारी | संकल्प दिन |
| 16 जानेवारी | स्टार्टअप दिन-Start Up Day |
| 25 फेब्रुवारी | करिअर कट्टा वर्धापन दिन |
| 8 मार्च | महिला दिन |
| 1 मे | महाराष्ट्र दिन |
| 22 जून | स्वागत सोहळा |
| 15 जुलै | कौशल्य विकास दिन |
| 9 ऑगस्ट | क्रांती दिन |
| 26 नोव्हेंबर | संविधान दिन |

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF 13 Video

## विद्यार्थी संवाद उपक्रम

विद्यार्थी संवाद उपक्रम

– इंडक्शन विक अंतर्गत करिअर कट्टा या उपक्रमासंबंधीत माहिती ही प्रशिक्षित १०० प्रतिनिधी मार्फत निवडक महाविद्यालयांमध्ये समान ठराविक आराखड्यानुसार एकावेळी विद्यार्थ्यांना दिली जाते.

– त्या पुढील कालावधीत मा. यशवंत शितोळे (अध्यक्ष MITSC) हे संपूर्ण महाराष्ट्रभरातील नियोजित महाविद्यालयातील प्रत्यक्ष भेटी द्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन करतात.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF 14 Video

## करिअर कट्टा पोर्टलवरील महाविद्यालय नोंदणी

करिअर कट्टा पोर्टलवर महाविद्यालय, विद्यार्थी तसेच समन्वयक व प्राचार्य यांची नोंदणी सुलभ ऑनलाइन पद्धतीने केली जाते. महाविद्यालय नोंदणीमुळे उपक्रमामध्ये सहभागी होता येते, तर विद्यार्थी नोंदणीद्वारे विविध कोर्सेस, मार्गदर्शन व कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध होतात. तसेच समन्वयक व प्राचार्य नोंदणीमुळे उपक्रमांचे नियोजन, समन्वय व अंमलबजावणी प्रभावीपणे करता येते. या पोर्टलमुळे सर्व माहिती व अपडेट्स एकाच ठिकाणी सहज उपलब्ध होतात.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF 15 Video

## विद्यार्थ्यांसाठी करिअर कट्टा ॲप

करिअर कट्टा युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी...

करिअर कट्टा ॲप हे विद्यार्थ्यांसाठी विकसित केलेले एक आधुनिक डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्म आहे. या ॲपद्वारे विद्यार्थ्यांना Live व Recorded Classes, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, कौशल्य विकास कोर्सेस आणि करिअरविषयक माहिती सहज उपलब्ध होते. तसेच नोटिफिकेशनद्वारे परीक्षा, असाइनमेंट व महत्त्वाच्या अपडेट्सची माहिती मिळते. वैयक्तिक गरजेनुसार शिक्षण (Personalized Learning) देऊन विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये प्रगती करण्यासाठी हे ॲप प्रभावी मार्गदर्शक ठरते.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF 16 Video

## करिअर कट्टा मासिक



करिअर कट्टा मासिक हे विद्यार्थ्यांसाठी दर महिन्याला प्रकाशित होणारे माहितीपूर्ण मार्गदर्शनपर साधन आहे. यामध्ये स्पर्धा परीक्षा, करिअर संधी, कौशल्यविकास यावरील लेख, चालू घडामोडी, प्रश्नमंजुषा, तज्ञांचे मार्गदर्शन व प्रेरणादायी यशोगाथा दिल्या जातात. हे मासिक विद्यार्थ्यांना उज्वल भविष्याची दिशा देत असून, संकेतस्थळावर नोंदणी करून वार्षिक रु. १२००/– शुल्क भरून प्रिंट व मोफत डिजिटल स्वरूपात उपलब्ध होते.

पूर्ण माहितीसाठी खालिल QR Code स्कॅन करा.

PDF 17 Video

## महाविद्यालयीन स्पर्धा




करिअर कट्टा अंतर्गत राज्य, विभागीय व जिल्हास्तरावर प्रोत्साहन स्पर्धांचे आयोजन केले जाते, ज्यामध्ये महाविद्यालयांच्या कार्याचे गुणांकनावर आधारित मूल्यांकन होते. जिल्हास्तरातून निवड होऊन राज्यस्तरावर अंतिम निवड केली जाते. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र दिले जातात, तसेच महिलांसाठी 'आधुनिक सावित्री पुरस्कार' व ५ उत्कृष्ट विद्यार्थ्यांना लॅपटॉपसाठी आर्थिक सहाय्य देऊन गौरविले जाते.

पूर्ण माहितीसाठी खालिल QR Code स्कॅन करा.

PDF 18 Video

## स्टेट रिसोर्स सेंटर

STATE RESOURCE CENTER — KNOWLEDGE • SUPPORT • COMMUNITY

स्टेट रिसोर्स सेंटर हे करिअर कट्टा अंतर्गत तज्ञांचे एकत्रित डिजिटल व्यासपीठ असून, राज्यभरातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शन, अभ्यासासाठी साहित्य व तज्ज्ञता उपलब्ध करून देते. UPSC, MPSC, बँकिंग, PSU, कॉर्पोरेट प्लेसमेंट, मुलाखत तयारी, उद्योजकता, परदेशी शिक्षण तसेच शासकीय भरती प्रक्रियेसाठी हे केंद्र प्रभावी सहाय्य करते.

पूर्ण माहितीसाठी खालील QR Code स्कॅन करा.

PDF 19 Video

Web. : www.mitsc.co.in    Contact : 7507652555    Email : careerkatta365@gmail.com